# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (दुपार)

जा.क्र. ४८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०६/०८/२०१६.

**१) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन शासकीय कर्मचा—याला मारहान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/०८/२०१६ रोजी १०.३५ वा. दर. यातील फिर्यादी बस चालक हा आपली बस क्र. एमएच ४० वाय ५५३९ ही पेट्रोल पंप ठाणा येथे प्रवासी चढ—उतर करीत असतांनी यातील आरोपीने फिर्यादीस 'ट्राफीक जाम किया असे' म्हणुन बस चालका जवळील दार उघडुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन फिर्यादीचे कॉल्लर पकडुन ओढतांन करुन फिर्यादीस थापडबुक्यांनी मारुन शासकीय कर्तव्यावरील कर्मचा—याला भिंती वाटेल हया उद्येशाने हमला केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३५३,३३२,२९४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) पैश्याच्या वादावरुन मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक ३१/०७/२०१६ रोजी १९.४५ वा. दर. यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादीस तुझ्यावर पैसे आहेत असे बोलुन भांडण करुन पैश्याच्या वादावरुन यातील तीन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस लाथा बुक्यांनी मारपीट केली व फिर्यादीचे डावे हाताचे खांदयाला, उजव्या पायाचे अंगठयाला मार लागुन डावा खांदा फॅक्चर करुन रस्त्यात भेट तुला जिवानीशी ठार मारल्या शिवाय राहणार नाही अशी धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. एक्सरे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२५,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहे.

**३) स्विप्ट गाडीची मोटार सायकलला धडकेत गंभिर जखमी . :—**

दिनांक ०५/०८/२०१६ रोजी ११.५५ वा. दर. यातील फिर्यादी रोमीत प्रमोद मेंढे वय १९ वर्ष, रा. पिपरी सौंदड हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३५ आर २८४८ वर बसुन सोबत मेघा कोल्हे वय १६ वर्ष, भुमेश्वर बागडे वय २५ वर्ष, असे मिळुन एमएससीआयटी ची परीक्षा देवुन बसस्टॉप साकोली कडुन प्रगती कॉलनी चौकातुन रोड क्रास करतांना मागुन येणारी स्विप्ट गाडी आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला धडक देवुन मोसा वरील बसलेल्या इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी १६.००वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन पुतनी असुन तिला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेल्याने असे फिर्यादीचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. डोंगरवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक ०६/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०२ केस, तिन सिट वाहनांवरती १२ केसेस व इतर वाहनांवरती १४८ केसेस करण्यात आलेल्या आहेत

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.